जा.क्र.२०१८/मग्रारोहयो/आस्था/कावी/३२१
जिल्हाधिकारी कार्यालय, पभणी.
दि.०८.०३.२०१८

# जाहिर निविदा सुचना-२०१८

## जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक, मग्रारोहयो परभणी.

## भाडेतत्वावर वाहन लावणे बाबत.

महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत व क्षेत्रीय कामाकरिता जिल्हाधिकारी कार्यालय परभणी येथे एक इनोव्हा (Innova AC), एक स्कॉरपीयो (Scorpio AC) किंवा एक टाटा सफारी (Tata Safari AC) लेटेस्ट (मॉडेल २०१७ च्या नंतर खरेदी केलेले) एक वर्षासाठी भाडे तत्वावर घ्यावयाची असुन इच्छुक नोंदणीकृत वाहनधारकाकडुन सिलबंद लिफाफामध्ये दोन लिफाफा पध्दतीने (लिफाफा क्र.१ तांत्रिक व लिफाफा क्र.२ व्यापारी लिफाफा) व्यावसायिक, वितरक यांचेकडुन एक वर्षांच्या कराराने निविदा मागविण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| जाहिरात प्रसिध्दीचा दिनांक | दिनांक : १२ मार्च, २०१८ |
| निविदा फॉर्म विक्रिचा दिनांक व ठिकाण | दिनांक : १२ मार्च, २०१८ ते १७ मार्च, २०१८ स.११:०० ते दु.१७:०० पर्यंत रोहयो विभाग जिल्हाधिकारी कार्यालय परभणी जि.परभणी (शासकीय सुट्टी वगळुन) |
| निविदा अर्ज विक्रि किंमत | रु.५००/- पाचशे रुपये फक्त राष्ट्रीयकृत बँकेचा डी.डी.जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक परभणी या नावाने जमा करण्यात यावा. |
| इसारा रक्कम | रु.५०००/- पाच हजार रुपये फक्त राष्ट्रीयकृत बँकेचा डी.डी.जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक परभणी या नावाने जमा करण्यात यावा. |
| निविदा दाखल करावयाचा अंतिम दिनांक व वेळ | दिनांक : १९ मार्च, २०१८ वेळ १७:०० वाजेपर्यंत. |
| निविदा उघडण्याचा दिनांक व ठिकाण | दिनांक : २१ मार्च, २०१८. जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी |

कोणतीही निविदा संपुर्ण अथवा अंशत: मंजुर करण्याचा किंवा कोणतेही कारण न दाखविता कोणतीही एक अथवा सर्वच निविदा नामंजुर करण्याचा अधिकारी जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक परभणी यांना राहील व तो सर्व निविदाधारकांना बंधनकारक राहील.

अटी व शर्ती या कर्यालयाची वेबसाईट www.parbhani.nic.in वर उपलब्ध आहे.

--/स्वाक्षरीत/-
**जिल्हाधिकारी तथा**
जिल्हा कार्यक्रम समन्वयक,
मग्रारोहयो परभणी.

## अटी व शर्ती

१. निविदा संबंधीची जाहीरात, सुचना / शुध्दीपत्रके परभणी जिल्हयाचे संकेतस्थळ www.parbhani.nic.in जाहिरत प्रसिध्दी करण्यात येत आहे.

२. A) निविदा बाबत आवश्यक बाबी,

B) निविदा पत्राची रक्कम रु.५००/- डी.डी. जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक परभणी यांच्या नावाने सादर केल्यानंतर निविदा विक्रि करण्यात येईल.

C) इसारा रक्कम रु.५०००/- चा राष्ट्रीयकृत बँकेचा स्वतंत्र डिमांड ड्राफट (DD) जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक परभणी, यांचेनावाने जोडणे आवश्यक आहे. इसारा रक्कम भरलेली नसल्यास निविदा विचारात घेतली जाणार नाही.

D) सेवा कर प्रमाणपत्र / ना देय दाखला.

E) विक्रिकर / सर्व्हीस टॅक्स, वाहनकर नोंदणी दाखला.

F) वाहनाचे टॅक्सी परमीट, वाहन विमा प्रमाणपत्र, पीयुसी प्रमाणपत्र.

G) वाहनचालकांचा वाहनचालविण्याचा ट्रान्सपोर्टचा परवाना, अनुभव प्रमाणपत्र.

H) पॅनकार्ड.

I) आवश्यक असलेल्या यंत्रसामुग्री /साहित्य उपलब्ध मनुष्यबळ / कर्मचारी यांची यादी.

उपरोक्त A ते I मधील कागदपत्राच्या छायांकित प्रति लिफाफा क्र.१ तांत्रिक लिफाफा जोडणे बंधनकारक राहिल. व्यापारी लिफाफा मध्ये निविदा प्रपत्रात वाहनाचा दर दर्शवुन सिलबंद करुन दोन्ही लिफाफे एका लिफाफयात सिलबंद करुन सादर करावेत.

३. निविदा दाखल करतांना संबंधीत संस्था किंवा पुरवठादारांने संस्थेचे नोंदणी केलेली असावे. संस्थेने शासकीय कार्यालयास वाहनांचा पुरवठा केल्याचा अनुभव असावा. तसे अनुभव प्रमाणपत्र जोडावे.

४. निविदा दाखल करतांना प्रादेशिक परिवहन अधिकारी, परभणी यांचे पत्रातील खासगी वाहनांच्या भाडे दराबाबत दर सुचीमध्ये नमुद केलेल्या दरांपेक्षा न्युनतम दराने निविदा दाखल करणे आवश्यक आहे. सदर पत्राची छायाप्रत या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत व कार्यालयीन दिवशी अवलोकनार्थ उपलब्ध आहे.

५. निविदेतील दर हे मासिक असुन ते २४ तासांकरीता बंधनकारक राहतील.

६. फक्त इनोव्हा, स्कॉरपीयो व टाटा सफारी कार मॉडेल २०१७ नंतरचे असावेत. तसेच वाहन ३००० कि.मी. पेक्षा कमी चालल्यास इंधनासह मासिक दर आणि ३००० कि.मी. पेक्षा जास्त चालल्यास इंधनासह प्रती कि.मी. दर नमुद करावेत.

७. ठेकेदारास / वाहन चालकास कोणत्याही प्रकारचे अग्रीम दिले जाणार नाही तसेच वाहन चालकास प्रवासादरम्यान कोणताही भत्ता दिला जाणार नाही. सदर भत्ते, असल्यास, देण्याची जबाबदारी संबंधीत ठेकेदाराची असेल.

८. यशस्वी निविदाधारकांनी आवश्यकतेनुसार वाहन चालकाची व्यवस्था करुन ठेवावी. वाहन कोणत्या व्यक्तिने चालवावे याचा निर्णय जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक परभणी यांचा

असेल. तथापी, मागणी केल्यास कंत्राटदारांनी वाहन चालक सुचना मिळाल्या पासुन ६.०० तासात उपलब्ध करुन द्यावा लागेल.

९. निविदा धारकाने निविदा सादर करतेवेळी वाहनाची सर्व कागदपत्रे म्हणजेच नोंदणी कर, विमा, फिटनेस परवाना, वाहन चालकाची अनुज्ञप्ती इ. वैध असणे अनिवार्य आहे. यापैकी कोणत्याही बाबींच्या अभवामुळे होणा-या कोणत्याही परिणामांना हे कार्यालय जबाबदार राहणार नाही संपुर्ण जबाबदारी निविदा धारकाची असेल.

१०. निविदाधारकांनी या कर्यालयाने मागणी केलेले वाहन आवश्यक संख्येमध्ये तात्काळ उपलब्ध करुन देणे अनिवार्य आहे. वाहन उपलबध होत नाही, वाहन बिघडले आहे, वाहन चालक उपलब्ध होत नाही अशा सबबी चालणार नाही. सदर वाहनांची आवश्यकता राष्ट्रीय कार्यक्रमासाठी आवश्यक असल्याने याबाबत कोणत्याही प्रकारचा विलंबास निविदाधारक जबाबदार राहील.

११. या कार्यालयाने दिलेल्या निर्देशानुसार मागणी केलेली वाहने विहित केलेल्या ठिकाणी व वेळी उपलब्ध ठेवावे लागेल.

१२. मागणीच्या कालावधीमध्ये वाहनाचा सर्व प्रकारचा खर्च, दुरूस्ती विषयी खर्च, टोलनाका फी निविदा धारकांनी करावयाचा आहे. याबाबत कोणत्याही प्रकारचा खर्च या कार्यालया मार्फत दिला जाणार नाही.

१३. यश्स्वी निविदाधारकांनी केवळ सुस्थितीतच वाहने पुरवावीत. प्रवासादरम्यान कोणत्याही प्रकारे वाहन बंद पडल्यास तेवढ्या कालावधीची रक्कम देयकातुन वजा करण्यात येईल याची नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे सदर त्रुटी बाबत निविदाधारक दंडात्मक कार्यवाहीस पात्र राहील.

१४. यशस्वी निविदाधारकांच्या प्रत्येक वाहनचा वैध अपघात विमा (सहीत) असणे अनिवार्य आहे. वाहन ताब्यात असतांना जर अपघात विमा नुतनीकरण करणे आवश्यक असेल तर असे नुतनीकरण निविदाधारक त्यांच्या स्तरावरुन करणे आवश्यक आहे. करार वैध असण्याच्या कालावधीमध्ये दुर्देवाने अपघात घडल्यास सदर अपघातामुळे झालेल्या जीवित व वित्त हानीची कोणतीही जबाबदारी जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक परभणी हे स्वीकारणार नाही.

१५. यशस्वी निविदाधारकांने आपले वाहन निविदाधारकाच्या वाहन चालकाशिवाय इतर कोणत्याही व्यक्तीस चालवण्यास दिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी निविदाधारकाची असेल. वाहन चालका व्यतिरिक्त इतर कोणीही वाहन चालवितांना अपघात घडल्यास सदर अपघातामुळे झालेल्या जीवित व वित्त हानीची कोणतीही जबाबदारी जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक परभणी हे स्वीकारणार नाही.

१६. निविदा धारक स्वत: त्यांची संस्था अथवा त्यांनी नियुक्त केलेले कर्मचारी हे कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधीत असता कामा नये. राजकीय पक्षाचा ज्ञात सहानुभूतीकर्ता किंवा कोणत्याही राजकीय पुढा-यांचा हितसंबंधी, नातेवाईक असता कामा नये, तसेच त्यांचे विरुध्द कोणताही फौजदारी स्वरपाचा गुन्हा दाखल / प्रलंबित असता कामा नये.

१७. निविदा मंजुर झालेल्या ठेकेदाराने जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक परभणी यांनी ठरवुन दिलेल्या विहित नमुन्यात रु.१००/- (रु.शंभर फक्त) च्या स्टँपपेपरवर करारनामा करणे अवश्यक आहे.

१८. निविदाधारकाच्या देयकातुन नियमानुसार आयकर व त्यावरील अतिरिक्त कर कपात करण्यात येईल. निविदाधारकास कोणत्याही प्रकारचे अग्रीम देण्यात येणार नाही.

१९. कोणत्याही अटीच्या अर्थाबद्दल किंवा इतर कोणत्याही बाबतीत विवाद उद्भावल्यास जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक परभणी यांचा निर्णय अंतीम व बंधनकारक राहील.

२०. वरीलपैकी कोणत्याही अटी अथवा शर्तीमधील संपुर्ण अथवा कोणत्याही भागाचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित निविदाधारका विरुध्द नियमानुसार कारवाई केली जाईल.

२१. सदर निविदे संदर्भातील कोणताही न्यायालयीन खटला परभणी जिल्हा न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात चाविला जाईल.

२२. सदरची निविदा अगर निविदेतील कोणताही भाग तसेच कोणत्याही अटी व शर्तीमध्ये कोणतीही पुर्व सुचना न देता रद्द करणेचा / राखुन ठेवणेचा तसेच सुधारणा करणेचा हक्क जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक परभणी यांनी राखुन ठेवला आहे.

**-/स्वाक्षरीत/-**
**जिल्हाधिकारी तथा**
**जिल्हा कार्यक्रम समन्वयक,**
**मग्रारोहयो परभणी.**